UGC CARE LISTED PERIODICAL
ISSN : 2278 - 6864

# Education and Society

## Since 1977

Vol-46, Issue-3, No.13, April-June : 2023

Indian Institute of Education

# Education and Society

## Indian Institute of Education


**Founders**

Prof. J. P Naik and Dr. Chitra Naik,

Shri. S. D. Gokhale, **Administrator**

**Editorial Board**

Dr. Jayasing Kalake, *Editor*

Dr. P. N. Gaikwad, *Executive Editor*

Dr. Prakash Salavi, *Assistant Executive Editor*

Dr. S. M. (Raja) Dixit

Prof. V. N. Bhandare

Dr. Sharmishtha Matkar

Shailja Sawant, Secretary



**Publisher**
Indian Institute of Education
J.P. Naik Path, 128/2, Kothrud, Pune 411038
Web-site: www.iiepune.org
E-mail: editor.iiepune@gmail.com

---

'Shikshan ani Samaj' (Education & Society), the educational Quarterly is owned, printed and published by the Indian Institute of Education, Pune. It is printed at Pratima Offset, 1B, Devgiri Estate, S.No. 17/1B, Plot No. 14, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune 411038 and Published at Indian Institute of Education, J.P. Naik Path, 128/2, Kothrud, Pune 411038. Editor: Dr. Jayasing N. Kalake Opinions or views or statements and conclusions expressed in the articles which are published in this issue are personal of respective authors. The Editor, Editorial Board and Institution will not be responsible for the same in any way.



Sakri (Dhule)

PRINCIPAL

ISSN: 2278-6864
Vol-47, Issue-2, No.7, April-June : 2023

# जयललिता : प्रादेशिक व राष्ट्रीय राजकारणातील प्रभावशाली महिला नेतृत्व

**डॉ. शरद बाबुराव सोनवणे** सहयोगी प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, त्रि.शि.सं.चेश्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे – 424304
ई-मेल – sharadpolsci@gmail.com

**सारांश (Abstract)**

तामिळनाडूच्या व राष्ट्रीय राजकारणात स्वतःची छाप पडणाऱ्या महिला राजकीय नेत्या जयललिता यांचीसुरुवातीच्या काळातील राजकीय कारकीर्द एम.जी.रामचंद्र(एमजीआर)यांच्यासावलीतच आकाराला आली. मात्र एमजीआर यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी जानकी व जयललिता यांच्यात निर्माण झालेल्या संघर्षात जयललिता यांची सरशी झाली वपक्षाचा वारसा त्यांच्याकडे येऊन त्याअण्णाद्रमुक'च्यासर्वेसर्वा बनल्या. पुढे जयललिता यांनी निवडणुकीच्या राजकारणात पक्षाला यश मिळवून देत एमजीआर यांचावारसा धडाडीने पुढे चालवला.एमजीआर यांच्या लोककल्याणकारी योजनांचा त्यांनी विस्तार केला. यासोबतच त्यांनी एक कणखर प्रशासक म्हणून आपली प्रतिमा निर्माण केली. त्यांची धोरणे कल्याणकारी होती आणि त्याच भावनेने त्यांनी आपल्याच नावाने अनेक लोकानुनयी योजना सुरू केल्या. त्यामुळे लोकांनी त्यांना पुन्हा सत्तेवर आणले व त्या लाखो जनतेच्या प्रिय 'अम्मा'झाल्या. त्यांच्या जीवनात आलेल्या अनेक चढउतारांना त्यांनी धैर्याने तोंड दिले. एम.करुणानिधी यांच्यासारख्या मुरब्बी विरोधकाला देखील त्यांनी धूळ चारली.याप्रकारे प्रादेशिक व राष्ट्रीय राजकारणातही जयललिता यांनी स्वतःचा दरारा निर्माण केला होता.डिसेंबर 2016 झालेल्या त्यांच्या निधनाने तामिळनाडूच्या राजकारणातील व राष्ट्रीय राजकारणातील एका प्रभावशाली महिला नेतृत्वाच्या सुवर्ण पर्वाचा अस्त झाला आहे; मात्र त्याचा प्रभाव आजही कायम आहे.

**कळीचे शब्द (Key words) :** जयललिता, एमजीआर,एम.करुणानिधी, द्रमुक, अण्णाद्रमुक

**प्रस्तावना**

भारतीय राजकारणात सुरुवातीपासूनच पुरुषांचे वर्चस्व राहिलेले असल्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग अत्यल्प असल्याचे दिसते. तरीदेखील ज्या मोजक्या महिलांना राजकीय क्षेत्रात येण्याची संधी मिळाली त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखविले आहे. भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे नाव जगाच्या राजकीय इतिहासात अजरामर झाले आहे.त्याचबरोबर उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री राहिलेल्या बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी देखील प्रादेशिक व राष्ट्रीय राजकारणात स्वतःचा प्रभाव निर्माण केलेला आहे. त्याचप्रमाणे तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री दिवंगत जयललिता यांनी देखील तामिळनाडूच्या व देशाच्या राजकारणात स्वतःचा अमिट ठसा उमटवलेला आहे. जयललिता यांचा एम.जी.रामचंद्रन (एमजीआर) यांच्यामुळे सिनेसृष्टीतूनराजकारणात प्रवेश झाला होता. पण एमजीआर यांच्या मृत्यूनंतर त्यांनी तामिळनाडूच्या राजकारणावर मजबूत पकड ठेवून राष्ट्रीय राजकारणात देखील स्वतःचे महत्वपूर्ण स्थान निर्माण केले होते.अण्णा द्रमुक पक्षात त्यांचीच हुकमतचालत होती. ही एकप्रकारची एकाधिकारशाहीच होती; परंतु त्यांच्या समर्थकांनी ती स्वीकारली होती. कारण जयललिता या लोकप्रिय व करिष्मा असणाऱ्या नेत्या होत्या. एमजीआर यांच्या निधनानंतर जयललिता यांनी तामिळनाडूमध्ये पक्षाला बहुमत मिळवून दिले व सरकार स्थापन केले. पुरुषी वर्चस्व असलेल्या राजकारणात त्यांनी विविध स्वरूपांच्या आव्हानांचा मुकाबला करत प्रचंड मेहनतीने पुरुषी अहंकारास टक्कर दिली आणि स्वतःची ताकद सिद्ध केली.केंद्रात स्वबळावर सत्ता मिळू शकत नसली तरी राष्ट्रीय राजकारणात स्वतःचे महत्व वाढविण्यासाठी वकेंद्राकडून राज्याला फायदा मिळवून देण्यासाठी त्यांनी काँग्रेस व भाजप या राष्ट्रीय पक्षांसोबत आपल्या सोयीनुसार हातमिळवणी केली. पण त्यांना गृहीत धरण्याची मोकळीक त्यांनी कोणालाही कधीच दिली नाही. तामिळनाडूच्या राजकारणात विरोधकांचे प्रस्त वाढवू न देता स्वतःचा प्रभाववाढवण्याचे कसब त्यांच्याकडे होते. याप्रकारे तामिळनाडूच्या व राष्ट्रीय राजकारणात एक प्रभावशाली महिला नेतृत्व म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या जयललिता यांच्या राजकीय वाटचालीचा व कार्यकर्तृत्वाचा वेध प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

ISSN: 2278-6864
Vol-47, Issue-2, No.7, April-June : 2023

**जयललितायांचे प्रारंभिक जीवन : सिनेसृष्टीकडून राजकीय रंगमंचाकडे प्रवास**

जयललिता यांचा जन्म 24 फेब्रुवारी 1948 रोजी कर्नाटकातील मेलकोटे येथे तामिळ अय्यंगार ब्राम्हण कुटुंबात झाला. जन्माच्या वेळी त्यांचे नाव कोमलवल्ली ठेवण्यात आले होते पण नंतर वयाच्या पहिल्या वर्षी त्यांचे नाव जयललिता ठेवण्यात आले. जयललिता या दोन वर्षाच्या असताना त्यांचे वडील जयराम यांचे निधन झाल्यावर त्यांची आई त्यांना घेऊन बेंगळुरूला राहायला गेली.पण त्यांना कधी बंगळुरूमधील मावशीच्या घरी तर कधी म्हैसूरमधील आजी-आजोबांच्या घरी राहावे लागले. पुढे त्यांची मावशी पद्मवल्ली यांचे लग्न झाल्यावरजयललिता त्यांच्याआईसह चेन्नईला रहायला गेल्या. तेथील चर्च पार्कच्या सेक्रेड हार्ट स्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला व तिथेच त्या 'कर्नाटक संगीत'आणि'नृत्य' शिकल्या.

कलेची आवड असणाऱ्या जयललिता यांनी बालकलाकार म्हणून कन्नड चित्रपटांमध्ये भूमिका केल्या होत्या. स्वतः अभिनेत्री असलेल्या त्यांच्या आईने त्यांना खऱ्या अर्थाने चित्रपट सृष्टीत आणले होते. सी.व्ही.श्रीधर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'वेन्निराआदाई' या तमिळ चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा नायिकेची भूमिका केली. परंतु बी.आर.पंथुलु यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आयीराथील ओरुवन' या चित्रपटात त्यांनीआपल्यापेक्षा वयाने 35 वर्षांनी मोठ्या असलेल्या एम.जी.रामचंद्रन(एमजीआर) यांच्यासोबत नायिकेची भूमिका केली आणि त्यांच्या राजकीय व फिल्मी करिअरचा आलेख पुढे उंचावतगेला.[1]

जयललिता या सौंदर्य आणि बुद्धी यांचा अप्रतिम संगम होता. त्या दहावी बोर्ड परीक्षेततामिळनाडू राज्यातपहिल्या आल्या होत्या.त्या काळातल्या त्या एकमेव अशा डान्सर होत्या की, ज्यांना भरतनाट्यम पासून मोहिनीअट्टम पर्यंत सर्वकाही येत होते. त्यांचे सौंदर्य तर वादातीत होतेच पण त्यांची बुद्धी अत्यंततीक्ष्ण असल्याने पाच-दहा मिनिटात त्या कुठलाही सीन कँच करत असत. त्यामुळेच एमजीआर सारखे व्यक्तिमत्व त्यांच्या प्रेमात पडले[2] होते.

**एम.जी.रामचंद्रन यांची संमोहक राजकीय कारकीर्द**

1944 मध्ये रामास्वामींनी आत्मसन्मान चळवळ व जस्टिस पार्टीचे विलीनीकरन करून 'द्रविड कळघम' नावाचा पक्ष स्थापन केला.[3] त्यानंतर 'द्रविड कळघम' या पक्षांत निर्माण झालेल्या मतभेदांमुळे स्वातंत्र्यानंतर दोनच वर्षांनी म्हणजे 1949 मध्ये पक्षात फूट पडली व अन्नादुराई यांच्या नेतृत्वाखाली 'द्रविड मुन्नेत्र कळघम' (द्रमुक) या पक्षाची स्थापना झाली.[4] द्रमुक हा पक्ष मागासवर्गीयांच्या सामाजिक उध्दारासाठी आरक्षणाच्या बाजूने ठामपणे उभा राहिला. 1953 मध्ये एम.जी.रामचंद्रन(एमजीआर) द्रमुक मध्ये सहभागी झाले आणि त्यांनी आपल्या चित्रपटातून द्रमुकचा प्रचार व प्रसार केला. त्यामुळे पक्षाला अधिक लोकप्रियता मिळाली. 1965 मध्ये झालेल्या हिंदी विरोधी आंदोलनामुळे केंद्र शासनाला हिंदी ही देशाची एकमेव राष्ट्रभाषा बनविण्याचे प्रयत्न सोडून द्यावे लागले. हिंदी विरोधी लाटेवर स्वार होऊन, द्रमुक पक्षाने 1967 मध्ये कॉंग्रेसचा पराभव करून तामिळनाडूमध्ये सत्ता स्थापन केली[5] होती. याप्रकारे एकेकाळी तामिळनाडूसहित सर्वच राज्यांमध्ये वर्चस्वशाली असलेल्या कॉंग्रेस पक्षालापराभूत करणारा द्रमुक हा भारतातील पहिला प्रादेशिक पक्ष ठरला.

1967 च्या निवडणुकीतील विजयानंतर दोनच वर्षात अन्नादुराई यांचे निधन झाले आणि फेब्रुवारी 1969 मध्ये द्रमुकमधील त्यांचे उत्तराधिकारी एम.करुणानिधी मुख्यमंत्री झाले. अन्नादुराईच्या मृत्यूनंतर करूणानिधींना मुख्यमंत्री बनवण्यात एमजीआर यांची महत्त्वाची भूमिका होती. तरीही दोघांमध्ये मतभेद झाले. परिणामी 1972 मध्ये एम.जी.रामचंद्रन हे द्रमुक पक्षातून बाहेर पडले. त्यांनी 17 ऑक्टोबर 1972 रोजी 'ऑल इंडिया अन्ना द्रविड मुन्नेत्र कळघम' (अन्नाद्रमुक) पक्षाची स्थापना केली. त्यानंतर 1977 साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत या पक्षाला मोठे यश मिळाले आणि एमजीआर तामिळनाडूचे मुख्यमंत्री बनले. यानंतर 1977, 1980 व 1984 मध्ये झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये 'अन्ना द्रमुक' पक्ष विजयी होत राहिला. याप्रकारे तामिळनाडूच्या राजकारणात एमजीआर यांचा एक लोकप्रिय नेता म्हणून उदय[6] झाला.

**एमजीआर'च्या छत्रछायेत जयललिता यांचे राजकीय रंगमंचावर पदार्पण**

मुख्यमंत्री एमजीआर यांनी जयललिता यांना राजकारणात आणले. ५ जून १९८२ रोजी त्यांचा अन्नाद्रमुक पक्षात प्रवेश झाला. त्यांनी आपले पहिले राजकीय भाषण 'पेनिन पेरुमाई' (स्त्रीची महानता) या विषयावर केले होते. पुढे त्यांची मुख्यमंत्री पौष्टिक मध्यान्ह भोजन योजनेवर देखरेख करणाऱ्या उच्चस्तरीय समितीच्या सदस्या म्हणून नियुक्ती झाली. जयललिता यांच्या इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वामुळे त्यांनी राज्यसभेचे सदस्य व्हावे, अशी एमजीआर



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S's.Smt.V.U.Patil Arts &
Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

यांची इच्छा होती. त्यानुसार12 मार्च 1984 रोजी विधानसभा अध्यक्ष के.राजाराम यांनी जयललिता यांच्या राज्यसभा उमेदवारीसाठीचे नामांकन प्रस्तावित केले.जयललिता निवडून आल्या आणि1984-1989 पर्यंत राज्यसभेच्या सदस्य राहिल्या.[7]याच काळात त्यांची अण्णाद्रमुक पक्षाच्या संसदीय गटाच्या उपनेतेपदीहीभूषविले.

**जयललिता यांचा राजकीय संघर्ष**

डिसेंबर 1987 मध्ये मुख्यमंत्री एमजीआर यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी जानकी रामचंद्रन व जयललिता यांच्यात वारसासंबंधी मतभेद निर्माण झाल्यावर वी.आर.नेदुनचेजियन यांना कार्यवाहक मुख्यमंत्री बनवण्यात आले. परंतु त्यांना मुख्यमंत्र्याच्या स्वरूपात काम करू दिले नाही व जानकी रामचंद्रन यांना मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली गेली. याबरोबरच अन्ना द्रमुक पक्षात 'जानकी गट' आणि 'जयललिता गट' असे दोन गट निर्माण झाल्यामुळे जानेवारी 1988 मध्ये झालेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत द्रमुक पक्षाला बहुमत मिळाले. अन्ना द्रमुक पक्षातील गटांमधले मतभेद अधिक वाढत गेले. मात्र दोन्ही गटातील बहुतांश सदस्यांचा जयललिता यांना पाठिंबा होता.[8]पुढे दोघींमध्ये समेट घडून आला व जयललिता यांच्याकडे अन्ना द्रमुक पक्षाची सर्व सूत्रे आली.

जयललिता यांची विरोधीपक्षनेतेपदी निवड झाली. तामिळनाडूमध्ये एका महिलेकडे विधानसभा विरोधीपक्षनेतेपद येण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यांच्या या कार्यकाळाततामिळनाडू विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना 25 मार्च 1989 रोजी मुख्यमंत्री करुणानिधी यांनी अर्थसंकल्प सादर करण्यास सुरुवात करताच काँग्रेसच्या सदस्यांनी विरोधी पक्षनेत्या जलिता यांच्याविरुद्ध पोलिसांनी गैरलोकशाही पद्धतीचे वर्तन केले असल्याचा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर जयललिता यांनीआपली कैफियत मांडताना नमूद केले की, मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या चिथावणीमुळे पोलिसांनी आपल्याविरुद्ध कारवाईकेली व आपले दूरध्वनी टॅपकरण्यात आले. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केले की, अर्थसंकल्प मांडण्यात येत असल्यामुळे याबाबत चर्चेला परवानगी देता येणार नाही.त्यामुळे विधानसभेचे विरोधीपक्षातील सदस्य संतप्त झाले वअण्णाद्रमुकपक्षाचे सदस्य घोषणा देत सभागृहातील मोकळया जागेत जमले. त्यातील एका सदस्याने रागाने करुणानिधी यांना धक्का देण्याचा प्रयत्न केल्यामुळे करुणानिधी यांचा चष्मा जमिनीवर पडून फुटला. काही सदस्यांनी अर्थसंकल्पाची पानेही फाडली. त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज तहकूब केले. या वातावरणात जयललिता सभागृहातून बाहेर जाण्यासाठी निघाल्या असताना द्रमुक'च्या एका सदस्यांने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी झालेल्या झटापटीत जयललिता यांच्या साडीचा पदर फाटला व त्या जमिनीवर पडल्या. त्यानंतर अण्णाद्रमुक'च्या सदस्यांनी जयललिता यांची सुटका केली. याप्रकारेविधानसभा अध्यक्षांसमोर सत्ताधारी द्रमुकच्या सदस्यांनी जयललिता यांच्यावर हल्ला केल्यानंतर तशा फाटक्या साडीनिशी त्या माध्यमांच्या देखत विधानसभेतून बाहेर आल्या आणिसभागृहात महिला जेव्हा सुरक्षित असतील तेव्हाच आपण सभागृहात पाऊल ठेवू अशी प्रतिज्ञा त्यांनी केली. अर्थात आपण आता तामिळनाडूच्या मुख्यमंत्री म्हणूनच सभागृहात येऊ असा निर्धार त्यांनी मनोमन केला होता. त्यानंतर 1992 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत जयललिता यांच्या नेतृत्वात अण्णाद्रमुकपक्षाला प्रचंड यश मिळाले आणि राज्यपालांनी त्यांना प्रथमच मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली.[9]पुढे चार वेळा त्यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री पद भूषविले. याप्रकारे भर विधानसभेत साडी फाडण्यापर्यंत विरोधकाची मजल जात असताना खचून न जाता त्यापुरुषी अहंकाराचा फणा त्यांनी आपल्या कर्तुत्वाने ठेचून काढला.

राज्याची कायदा व सुव्यवस्था ज्यांच्या हातात आहे त्यांच्याकडून व ज्याठिकाणी कायदा सुव्यवस्थेबद्दल चर्चा होते अशाठिकाणी याप्रकारे स्त्रीत्वाचा अत्यंत अपमान झाला. स्त्री म्हणून झालेल्या या अपमानाचा, मानहानीचा, त्यांना संपवण्याच्या प्रयत्नांचा स्त्री म्हणूनच बदला घ्यायचा या विचारातून जयललिता यांचा पुढचासगळा प्रवास झालेला दिसतो. या प्रसंगातून बाहेर येताना त्यांनी आपला पेहराव बदलला, राहणं बदललं आणि त्या 'अम्मा'च्या रूपात जनतेसमोर आल्या. अम्मा म्हणजे आई ही सगळयांची काळजी घेणारी, सर्वांसाठी खस्ता खाणारी, मुलांच्या सुखाशिवाय स्वतःला काहीच नको असलेली ही स्वतःची प्रतिमा त्यांनी जाणीवपूर्वक तयार करत नेली, असे त्यांच्या कारकिर्दीवरून दिसते. विधानसभेत त्यांच्या बाबतीत जे घडले ते जनतेलाही आवडले नसल्याचे त्यांनी पुढच्या निवडणुकीत मत पेटीतून दाखवून दिलेच; पण तोपर्यंत जयललिताह्या 'अम्मा' बनून गेल्या होत्या. हा भावनिक खेळ त्यांनी खूप जाणीवपूर्वक उभा केला.[10]तो यशस्वी होण्यात त्यांना तिथल्या अतिसामान्य महिलांचा जो प्रतिसाद मिळाला, त्याचा फार मोठा वाटा आहे.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

**जयललिता यांची राजकीय कारकीर्दववैचारिक वळणे**

एमजीआर यांच्यानंतर अन्ना द्रमुक'ची धुरा जयललिता यांच्याकडे आल्यावर पक्षाच्या विचारसरणीत बदल झालेला दिसतो. कारण रामास्वामी यांनी ब्राह्मणांचा विरोध केला होता, तर जयललिता स्वत ब्राम्हण होत्या व त्याचा त्यांना अभिमान देखील होता. निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी त्या स्वत:च्या घरी व सार्वजनिक मंदिरात जाऊन पूजा अर्चा करीत असत. रामास्वामी यांनी हिंदुत्वाचा तिरस्कार केला होता, तर जयललिता यांनी हिंदुत्ववादी भाजप बरोबर आघाडी केली. द्रविडीयन अस्मितेचा त्यांच्याकडे अभाव होता. परंतू त्यांनी मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ओबीसीचे आरक्षण 50 टक्क्यावरून 65 टक्केपर्यंत वाढवले. स्त्रियांना अन्ना द्रमुक'ची उमेदवारी मोठ्या प्रमाणावर देऊन स्त्रियांचे राजकीय सक्षमीकरण केले व स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण घडवून आणले[11] तामिळनाडूच्या राजकारणात जसे एमजीआर यांना दैवत्व प्राप्त झाले होते, तसेच मिथक जयललिता यांच्या बाबतही होते, परंतू ते त्यांच्या व्यवहारिक राजकारणातून जन्मले होते आणि त्यात मातृत्वाचा (अम्मा) आभास होता. मात्र ती भावना एखाद्या कुटुंबाप्रती नव्हती तर ती संपूर्ण समाजाशी जोडलेली होती.[12]

1991 मध्ये केंद्राने द्रमुक शासन बरखास्त करून राज्यात राष्ट्रपती शासन लागू केले. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत द्रमुक'ला केवळ एक जागा मिळाली तर अन्नाद्रमुक'ला 163 जागा मिळाल्या आणि जयललिता मुख्यमंत्री झाल्या. मार्च 1993 मध्ये कॉंग्रेस बरोबर आघाडी करून जयललिता केंद्र सरकारमध्ये सहभागी झाल्या व आघाडीचा फायदा घेत त्यांनी 76 वी घटनादुरुस्ती (31 ऑगस्ट 1994) विधेयक पारित करून घेतले. त्याचा उद्देश राज्यात मागासवर्गासाठी 69 टक्के आरक्षणाची तरतूद करणे हा होता. केंद्र सरकारने तामिळनाडू अधिनियम पारित करून तामिळनाडूमधील 69 टक्के आरक्षण कायम ठेवण्यासाठी त्याचा समावेश परिशिष्ट 9 मध्ये केला.[13]24 जून 1991 ते 12 मे 1996 हा जयललिता यांचा मुख्यमंत्रीपदाचा पहिला कार्यकाल राहिला. त्यानंतर 2001 मध्ये दुसऱ्यांदा 2011 मध्ये तिसऱ्यांदा आणि 23 मे 2016 रोजी चौथ्यांदा जयललिता मुख्यमंत्री झाल्या होत्या.

**राष्ट्रीय राजकारणातील स्थान व महत्वकांक्षा**

जयललिता या सुमारे तीन दशक तामिळनाडूच्या आणि देशाच्या राजकारणात एक महत्त्वाच्या नेत्या म्हणून वावरल्या. द्रमुक'ची भूमिका पूर्वापार कॉंग्रेस विरोधाची राहिली होती. मात्रएमजीआरयांचे कॉंग्रेसबरोबर अतिशय जवळचे संबंध होते व त्यामुळे अन्ना द्रमुक कॉंग्रेसचा सहकारी पक्ष देखील राहिला होता.एमजीआरयांच्यानंतर जयललिता यांनी देखील तामिळनाडूच्या राजकारणात कॉंग्रेसची मदत घेत आणि त्या बदल्यात केंद्रात कॉंग्रेसच्या बरोबर राहत राज्याच्या आणि राष्ट्रीय राजकारणात आपले बस्तान बसवले होते. पण जयललिता यांनी एमजीआरयांच्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकत राष्ट्रीय राजकारणात स्वतःचा दबदबा निर्माण करून सौदेबाजीचे राजकारण केले. यासाठी त्यांनी सर्व पर्याय खुले ठेवले होते. जयललिता 1998 मध्ये भाजपबरोबर गेल्या व2004 मध्येही त्यांनी भाजपला साथ दिली. राष्ट्रीय राजकारणातीलअस्वस्थ द्विध्रुवीयतेमध्ये आपण तिसरी शक्ती बनण्याचे आकर्षण त्यांना या टप्प्यावर सतत राहीले. परिणामी कॉंग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांपासून त्यांनी बराच काळ अंतर राखले. तामिळनाडूत या दोन्ही पक्षांशिवाय निवडून येता येते हे त्यांनी दाखवून दिले आणि राज्याच्या राजकारणाचे निखळ प्रादेशिक स्वरूप अधोरेखित केले.[14]

एप्रिल-मे 2014 मधील लोकसभा निवडणुकीसाठी 26 फेब्रुवारी 2014 रोजी अन्नाद्रमुकच्या सर्वेसर्वा जे. जयललिता यांनी आपल्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर म्हटले होते की, 'माझ्या या जाहीरनाम्यामध्ये अनेक आश्वासने व धोरणांचा समावेशअसून ती केवळ तामिळनाडूसाठी नव्हे तर देशाला डोळयासमोर ठेवून अखिल आहेत...' खरे तर 1984 पासूनच त्यांचा दिल्लीशी जवळचा संपर्क होता, पण तामिळनाडू पलीकडील देशाच्या विकासाचा विचार त्या प्रथमच बोलून दाखवित होत्या. देशाची सत्ता मिळाल्यास,तामिळनाडू प्रमाणेच देशभर लोकप्रिय योजनांची (टीव्ही, मिक्सर, पंखे, गाई मोफत) अंमलबजावणी करण्याचे आश्वासन त्या देत होत्या. त्याचबरोबर महिला आरक्षण विधेयकापासून संरक्षण, परराष्ट्र धोरणापासून थेट संयुक्त राष्ट्रसंघामध्ये देशाला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळवून देण्याच्या घोषणा त्यांच्या जाहीरनाम्यात होत्या. प्रथमच उघड होत असलेल्यात्यांच्याया राष्ट्रीयमहत्त्वकांक्षेचे सर्वांनाच अप्रूप वाटत होते.याबाबतीत जयललित यांचे गणित मात्र निव्वळ एका गृहितकावर विसंबून होते. ते म्हणजे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपला स्वबळावर सत्ता मिळण्याचे चिन्ह त्यांना दिसत नव्हते. फार तर भाजप सर्वाधिक मोठा पक्ष ठरेल पण मोदींमुळे भाजपला मित्रपक्ष मिळणे अवघड जाईल असे इतरांप्रमाणे त्यांनाही वाटत होते. अशा परिस्थितीत तामिळनाडूमध्ये आपल्या पक्षाला मोठे यश



Sakri (Dhule)
PRINCIPAL
S.S's.Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

मिळाल्यास तिसरी आघाडी निर्माण करून 7 रेसकोर्सपर्यंतधडक देण्याची त्यांची मनोकामना होती. म्हणूनच तामिळनाडूचा महिला पंतप्रधान करण्यासाठी त्यावेळी त्यांच्या पक्षाकडून मते मागितली गेली.'पंतप्रधानपदासाठी मत द्या' असे आवाहन करणारी भित्तिपत्रके त्यावेळी तामिळनाडूमध्ये सर्वत्र झळकली होती. यादृष्टीने जयललितांचा पहिला अंदाज अचूक ठरला व अण्णाद्रमुक पक्षाला राज्यातील लोकसभेच्या 39 जागांपैकी तब्बल 34 जागा मिळाल्या आणि अण्णाद्रमुक हा लोकसभेतील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. पण जयललिता यांचा दुसरा अंदाज मात्र पूर्णतः चुकला आणि मोदींच्या नेतृत्वातील भाजपला स्वबळावर स्पष्ट बहुमत प्राप्त झाले. भाजपला राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) कुबड्यांचीही गरज उरली नाही. यामुळे जयललिता यांच्या राष्ट्रीय महत्त्वकांक्षेचा स्वप्नभंग झाला आणि पहिल्या तमिळ पंतप्रधान होण्याची त्यांची इच्छा फलद्रूप होऊ शकली नाही.[15]

2014 मध्ये भाजपच्या बरोबर न जाण्याचा त्यांचा निर्णय राष्ट्रीय राजकारणातील त्यांचे महत्व अचानक कमी करणारा ठरला. कारण भाजपच्या बरोबर तर जायचं नाही आणि तरीही भाजपच्या थेट विरोधाचे राजकारण देखील करायचे नाही, ही कसरत राज्यापूर्ती यशस्वी ठरली असली तरी राष्ट्रीय रंगमंचावर ही खेळी त्यांना काहीशी महाग पडली. त्यातच आधी भ्रष्टाचाराच्या खटल्यांचे शुक्लकाष्ठ आणि मग आजारपण यामुळे त्यांच्या राजकीय वाटचालीच्या शेवटच्या दोनएक वर्षांमध्ये जयललिता राष्ट्रीयराजकारणाच्या रंगमंचावरून काहीशा मागे पडलेल्या दिसल्या.[16] तरीदेखील पुरुषांचे प्राबल्य असलेल्या राजकारणाच्या क्षेत्रात त्यांनी महिला असूनही हुकमत गाजविली. तामिळनाडूची केंद्र सरकारकडे पाहण्याची दृष्टीही त्यांनी बदलून टाकली. याबाबतीत त्यांनी त्यांचे गुरु एमजीआर यांच्याहूनही एक पाऊल पुढे टाकले. एमजीआरयांनी कॉंग्रेसची मर्जी राखण्याचे धोरण स्वीकारून निवडणुकीत युती करताना कॉंग्रेसला लोकसभेच्या दोन तृतीयांश जागा दिल्या होत्या. पण जयललिता यांनी पी.व्ही.नरसिंहराव आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्याशासनांवर आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी दबाव टाकला.[17] याप्रकारे जयललिता यांनी प्रादेशिक राजकारणात तर आपला दरारा निर्माण केला होताच, पण त्याचबरोबर राष्ट्रीय राजकारणात देखील त्यांनी स्वतःचा प्रभाव निर्माण केला होता.जयललिता यांच्या निधनानंतर 2021 मध्ये झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अण्णा द्रमुक पक्षाचा पराभव झाला. या निवडणूक निकालामधून व अण्णा द्रमुक'च्या पराभावामधून जयललिता यांच्या नसण्याची पोकळी स्पष्टपणे दिसून आली.

## समारोप

तामिळनाडूच्या सलग चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या जयललिता यांचा प्रवास थक्क करणारा आहे. एमजीआर यांच्या आग्रहास्तव राजकारणात आलेल्याजयललिता यांनी पुढे त्या सक्षम राजकारणी असल्याचा प्रत्यय दिला. राजकीय चातुर्य, मुसद्दीपणा, विचारांची प्रगल्भता, धाडसीपणा, संघटन कौशल्य आणि जनहिताच्या कामासाठी राजकारणाचा पद्धतशीर उपयोग करण्याचे कसब त्यांच्याकडे असल्यामुळे त्यांचा राजकीय प्रभाव उतरोत्तर वाढतच गेला.तामिळनाडूच्या प्रादेशिक राजकारणाबरोबरच राष्ट्रीय राजकारणातही जयललितायांनी स्वतःचा दरारा निर्माण केला होता. अशा या अलौकिक महिला नेतृत्वाचे ५ डिसेंबर २०१६ रोजी निधन झाले आणि तामिळनाडूतीलच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणातील एका पर्वाचा अंत झाला.मात्र एक प्रभावशाली महिला नेतृत्व म्हणून जयललिता यांचे नाव भारताच्या राजकीय इतिहासातून कधीच पुसले जाऊ शकणार नाही, असा ठसा त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने उमटवलेला आहे.

## संदर्भ

1. दैनिक लोकमत, 7 डिसेंबर 2016, पृ.1
2. दैनिक दिव्यमराठी, 'रसिक',11 डिसेंबर 2016, पृ.7
3. कुलकर्णीसुहासवचंपानेरकरमिलिंद, 'असा घडला भारत : 1947-2012', रोहन प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, 2013, पृ.116
4. कित्ता
5. जोशी मनोहर, 'शिवसेनची निर्मिती, वाढ, स्वरुप, यशापयश आणि भवितव्य', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, 2011, पृ.158
6. उपरोक्त, कुलकर्णीसुहासवचंपानेरकरमिलिंद, 'असा घडला भारत: 1947-2012', पृ.398
7. द हिंदू, 7 डिसेंबर 2016
8. सिंह बालेन्द्र, 2007, 'भारत की सांझा सरकारें एवं क्षेत्रिय दल', आरबीएसए पब्लिशर्स, जयपुर, पृ.117

Sakri (Dhule)



PRINCIPAL
K.S.S's Sri V.U.Patil Arts & Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

ISSN: 2278-6864
Vol-47, Issue-2, No.7, April-June : 2023

9. दैनिक लोकसत्ता, 7 डिसेंबर 2016,पृ.7,11
10. दैनिक लोकसत्ता, 'लोकरंग', 11 डिसेंबर 2016,पृ.1
11. पळशीकर सुहास (संपा.), 2009, 'भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण', साधना प्रकाशन, पुणे, पृ.26
12. इंडिया टुडे, 8 जुन 2016, पृ.28
13. उपरोक्त, सिंह बालेन्द्र, 2007, 'भारत की साझा सरकारें एवं क्षेत्रिय दल', पृ.177
14. दैनिक लोकसत्ता, 'लोकरंग', 11 डिसेंबर 2016,पृ.1
15. दैनिक लोकसत्ता, 7 डिसेंबर 2016,पृ.11
16. दैनिक लोकसत्ता, 'लोकरंग', 11 डिसेंबर 2016,पृ.1
17. दैनिक लोकमत, 7 डिसेंबर 2016,पृ.1

Sakri (Dhule)

PRINCIPAL
V.U.Patil Arts &
Dr.B.S. Science College
Sakri, Dist.Dhule